ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 5434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख २५ जून, १९५८ अंक १६

## विविध माहिती

**लंडनसाठीं नवा विमानतळ**—लंडनला जाणाऱ्या-येणाऱ्या विमानांसाठीं आणखी एक विमानतळ सरे परगण्यांत बांधण्यांत आला आहे. विमानतळ बांधण्यासाठीं ७० लाख पौंड खर्च आला आणि तो बांधण्यास दोन वर्षांचा काळ लागला. विमानांना उतरण्यासाठीं लागणाऱ्या पट्टीची लांबी ७,००० फूट आहे.

**सौराष्ट्रांतील पाणीपुरवठा**—सौराष्ट्रांतील एकूण शेत-जमिनींपैकीं अवघ्या ३०,००० एकर जमिनीला पहिली पंचवार्षिक योजना पूर्ण होण्यापूर्वी पाटबंधाऱ्यांचें पाणी मिळत होतें. पहिली योजना पूर्ण झाल्यावर १,९७,००० एकर जमिनीला पाणीपुरवठा होऊं लागला. दुसरी योजना पूर्ण झाल्यावर आणखी ९२,००० एकर जमीन पाण्याखालीं येईल.

**जपानची युद्धोत्तर पुनर्घटना**—गेल्या महायुद्धानंतर जपानच्या उद्योगधंद्यांची अतोनात हानी झालेली होती. ती भरून काढण्याच्या कामीं परदेशीय भांडवलाची मोठ्या प्रमाणावर मदत झालेली आहे. युद्धानंतर जपानची शिक्षणपद्धति अमेरिकन धर्तीची करण्यांत आली आहे. अशी माहिती एका जपानी शास्त्रीय संशोधकानें सांगितली.

**वर्गभेदावर तोडगा**—रेल्वेंतील वरिष्ठ अधिकारी व कनिष्ठ श्रेणीचा नौकरवर्ग ह्यांच्यांतील वर्गभेदाची भावना नाहींशी करण्यासाठीं रेल्वे बोर्डानें एक कार्यक्रम आंखला आहे. कार्यक्रमांत चहापानासारख्या सामाजिक समारंभाचा समावेश आहे. अशा प्रसंगीं वरिष्ठ नौकर आपल्या पत्नींसह कनिष्ठ नौकरांना वाढण करतील.

**दिल्ली-मद्रास विमानमार्ग**—इंडिअन एअरलाइन्स कॉर्पोरेशननें ते दिल्ली-मद्रास असा थेट विमानमार्ग चालू केला आहे. ह्या मार्गावर व्हायकाऊंट जातीचीं विमानें वापरण्यांत येणार आहेत. त्यांचा वेग ताशीं ३०० मैल असतो. देशांतील सर्व महत्त्वाचीं शहरें विमानमार्गानें जोडण्याचा कॉर्पोरेशनचा संकल्प आहे.

**हिरे कापण्याची नवी पद्धत**—रशिअन शास्त्रज्ञांनीं हिरे कापण्यासाठीं एक नवीन यंत्र शोधून काढलें आहे. ह्या यंत्रांत ध्वनिलहरींचा उपयोग करण्यांत येतो. हिरा हा अत्यंत कठीण असल्यानें तो कापण्यास वेळ लागतो. नव्या यंत्राच्या साह्यानें कापण्यासाठीं लागणाऱ्या वेळांत खूपच बचत झाली आहे. ह्या पद्धतींत हिऱ्याचा भुगाहि कमी होतो.

**मांसाहारी लोकांना विनंति**—१९७६ मध्यें जगाच्या लोकसंख्येंत ३५ कोटी तोंडांची भर पडलेली असेल. आजच जगाच्या लोकसंख्येपैकी एकतृतीयांश लोक अर्धपोटीं आहेत. म्हणून मांसाहारी लोकांनीं आठवड्यांतून एक दिवस शाकाहार करावा, अशी सूचना ब्रिटिश शाकाहारी संघटनेच्या चिटणिसांनीं केली आहे.

**दुबार कर टाळण्यासाठीं**—भारत व पश्चिम जर्मनी ह्या देशांत दुबार कर टाळण्यासाठीं करावयाच्या कराराबद्दलच्या मसुद्यावर एकमत झालें आहे.

**‘उदयगिरी’चा सांगाडा**—दिल्लींतील सरकारी समारंभांत सजवून मिरविण्यांत येणारा ‘उदयगिरी’ नांवाचा हत्ती वेडा झाल्यामुळें त्याला ठार करण्यांत आलें. आतां त्याचा सांगाडा पदार्थसंग्रहालयांत ठेवण्यांत येणार आहे. हत्ती विध्वंस करूं लागल्यावर त्याच्यावरील माहुताला मोठ्या शिकस्तीनें वांचविण्यांत आलें.

**शास्त्राचा शांततामय उपयोग**—सुप्रसिद्ध लेनिन शांतता पारितोषक डॉ. सी. व्ही. रमण ह्यांना देण्यांत आलें आहे. पारितोषकाचा स्वीकार करतांना डॉ. रमण म्हणाले कीं भारताच्या शांतताप्रिय धोरणाचा सन्मान करण्यासाठीं हें पारितोषक देण्यांत आलें आहे.

**ब्रिटिश शास्त्रज्ञांची रशिआला भेट**—हैड्रोजन स्फोटापासून शक्ति निर्माण करणारें ‘झेटा’ यंत्र ज्या ब्रिटिश शास्त्रज्ञांनीं तयार केलें त्यांना ह्या क्षेत्रांतील रशिअन कामगिरी पाहण्यासाठीं रशिआला पाठविण्यांत येणार आहे. सोव्हिअट ॲकेडमी ऑफ सायन्सेस ह्या संस्थेतर्फे त्यांना बोलाविण्यांत आलें आहे.

**सोडचिठ्ठी देण्यास पुरेसें कारण**—इटालीच्या सर्वोच्च न्यायालयानें विवाहविषयक एका खटल्यांत असा निर्णय दिला आहे कीं, स्त्रीनें लग्नापूर्वी आपल्या शारीरिक अपावित्र्याची माहिती नवऱ्यापासून लपवून ठेवली असेल तर नवऱ्याला सोडचिठ्ठी मिळण्याचा अधिकार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठीं
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## बँकांचीं कर्जे आटोक्यांत ठेवण्यांत रिझर्व्ह बँकेचें यश

### कडक उपाययोजना

१९५७ मधील बँकिंगविषयक रिझर्व्ह बँकेचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. १९५७ च्या सुरुवातीस आर्थिक परिस्थितीचा विशेष ताण भासूं लागला होता, त्याच्या दुरुस्तीसाठी सरकारनें व रिझर्व्ह बँकेनें केलेली उपाययोजना ह्या अहवालांत दिग्दर्शित केली आहे. बँकिंगपुरतें पाहिलें, तर १९५७ मधील ठेवींची वाढ डोळ्यांत भरण्यासारखी आहे. शेड्यूल्ड बँकांकडील ठेवींत २४५ कोटी रुपयांची (२३.३%) भर पडली; १९५६ मध्यें ती भर ७७ कोटी रुपयांची (७.९%) होती. अमेरिकेच्या पब्लिक लॉ ४८० प्रमाणें ह्या देशांत धान्याची जी आयात करण्यांत आली, तिच्या किंमतीची रकम भारतांतील अमेरिकन अधिकाऱ्यांनीं बँकांकडे डिपॉझिट ठेवली ती ठेवींतील वाढीस मुख्यतः कारणीभूत आहे. आयातीवरील कडक बंधनांमुळें, व्यापारी फर्म्सनीं शिलकांची रकम ठेवींत गुंतविली. ठेवीवरील व्याजाचे दर वाढल्यामुळें चालू खात्यांतील रकमा मुदती ठेवींत गेल्या आणि बँकांकडे बाहेरचा पैसाहि आकृष्ट झाला. वाढलेल्या मिळकतींपैकीं कांहीं रकम बँकांकडे आली आणि स्टेट बँकेच्या शाखावाढीमुळेंहि ठेवींत भर पडली असावी. ठेवींतील वाढीपैकीं हिंदी शेड्यूल्ड बँकांचा वाटा २२४ कोटी रुपयांचा (९०%) होता, तर बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या ठेवी २४ कोटी रुपयांनीं कमी झाल्या.

१९५६ मध्यें ठेवींच्या मानानें बँकांनीं दिलेल्या कर्जांत जास्त वाढ झाली होती; १९५७ मध्यें कर्जवाढीच्या तिप्पट ठेवींत वाढ झाली. भात, तांदूळ, गहूं, हरबरा, साखर, इत्यादींच्या तारणावरील कर्जवाढ तर विशेष चिंतनीय होती. रिझर्व्ह बँकेनें आपला कर्जपुरवठा अधिक महाग केला, बँक-रेट वाढवला, तरी बँकांचीं कर्जे वाढतच चाललीं. शेवटीं रिझर्व्ह बँकेनें अधिक कडक उपाय योजून बँकांना कर्जाची रकम ८०० कोटी रुपयांपर्यंत खालीं आणण्याची सूचना दिली (७ जून, १९५७ रोजीं ही रकम ९४० कोटी रुपयांवर गेली होती). मार्जिन्स वाढविणें, एकूण कर्जाची रकम ठराविक प्रमाणांत खालीं आणावयास लावणें, चुकार बँकांना त्यासाठी तंबी देणें, इत्यादि मार्गांचा अवलंब रिझर्व्ह बँकेनें केला; आणि अखेर १९५७ च्या शेवटीं कर्जाची रकम ८२० कोटींवर येऊं शकली. १९५६ अखेरच्या मानानें ती फक्त १०% जास्त होती. ठेवींत मोठी वाढ झाल्यामुळें, कर्जांचें ठेवींशीं प्रमाण डिसेंबर १९५६ मध्यें ७०.८% होतें तें डिसेंबर १९५७ अखेर ६३.२% वर आणून ठेवतां आलें.

---

### अमेरिकन बँकेच्या हिंदी नोकराचा परदेश-प्रवास

फर्स्ट नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्कच्या मुंबई शाखेतील सब अकौंटंट व प्रो-मॅनेजर, श्री. के. स. करंत ह्यांना बँकेनें चार महिन्यांच्या परदेशाच्या प्रवासावर पाठविलें आहे. स्थानिक अधिकारी व नोकर ह्यांपैकीं विशेष लायक असतील, अशांना बँक आपल्या खर्चानें पाठवीत असते. श्री. करंत हे तीन महिने अमेरिकेंत रहातील. तीन आठवडे तेथील कारखान्यांना भेटी देतील. श्री. करंत ह्यांनीं बँकेंत कारकून ह्या नात्यानें १९४५ मध्यें प्रवेश केला. त्यांना सर्व खात्यांतून काम करण्यास संधि देण्यांत आली. ते इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्सचे सर्टिफाइड असोसिएट झाले आहेत. २२ जून रोजीं ते जपानमार्गें अमेरिकेस रवाना झाले.

### रिफायनान्स कॉर्पोरेशनच्या संचालक मंडळाची पहिली बैठक

रिफायनान्स कॉर्पोरेशन फॉर इंडस्ट्री (प्रायव्हेट) लि. या नव्यानेंच स्थापन झालेल्या संस्थेच्या संचालक मंडळाची पहिली बैठक रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आणि या कॉर्पोरेशनचे अध्यक्ष श्री. एच्. व्ही. आर. अय्यंगार यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. सध्यां प्रत्येकी एक लक्ष रु. च्या १२५० शेअर्सचें एकूण १२.५ कोटी रु. भांडवल विक्रीस काढण्याचा निर्णय या बैठकींत घेण्यांत आला. रिझर्व्ह बँक, लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इतर १४ शेड्यूल्ड बँका यांनाच हे शेअर देण्यांत येतील. या कॉर्पोरेशनला सुमारें २६ कोटी रु. पर्यंत कर्ज घेतां यावें म्हणून भारताच्या राष्ट्रपतींबरोबर करावयाच्या करारासंबंधींहि या बैठकींत विचार करण्यांत आला. रिझर्व्ह बँकेच्या इंडस्ट्रिअल फायनान्स डिपार्टमेण्टचे चीफ ऑफिसर श्री. टी. के. रामसुब्रम्हण्यम् यांची सदर कॉर्पोरेशनचे जनरल मॅनेजर म्हणून नेमणूक करण्यांत आली.

---

### बँकिंग परिषदेचा रिपोर्ट

महाराष्ट्रांतील व शेजारच्या प्रदेशांतील बँकर्सची एक परिषद पुणें येथें डॉ. एस्. के. मुरंजन ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नोव्हेंबर, १९५७ मध्यें भरली होती. त्यावेळीं "बँकिंग इन् महाराष्ट्र अँड अॅड्जॉइनिंग रिजन" ही पुस्तिका प्रसिद्ध करण्यांत आली होती. ह्या परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री. के. पां. जोशी, उद्घाटक श्री. न. वि. गाडगीळ व अध्यक्ष डॉ. मुरंजन ह्यांचीं भाषणें एकत्र दिलेला व परिषदेनें केलेल्या चर्चेच्या टिपणांचा अहवाल आतां तयार झाला असून, त्याचा प्रकाशनसमारंभ श्री. के. पां. जोशी ह्यांचे हस्तें दि. १९ रोजीं झाला. अहवालाच्या अखेर, ज्यांनीं परिषदेच्या वेळीं तयार केलेल्या पुस्तिकेच्या प्रकाशनास साहाय्य केलें होतें अशा ३९ बँकांची यादी देण्यांत आली आहे; त्याचप्रमाणें उपस्थित व्यक्तींचीहि यादी छापली आहे. अहवालाची पृ. सं. ३८ आहे.

---

### बँकेंतील नोकरींच्या अर्जांत अपत्यांची संख्या लिहा

बँक ऑफ इंडिया लि. नें सब् ऑफिसर्सच्या जागांसाठीं अर्ज मागविले आहेत. जागेचा सुरवातीचा पगार ३१५ रु. आहे. अर्जदारांनीं आपल्या अर्जांत विवाहित, का अविवाहित हें लिहून विवाहित असल्यास अपत्यांची संख्या नमूद करावयाची आहे. अपत्यांची संख्या मर्यादित असणारांना नोकरी मिळण्याचा संभव जास्त असणार, असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. पाश नसलेल्या अविवाहितांना अधिक पसंत करण्यांत येईल का विवाहित अधिक जबाबदारीच्या जाणीवेचे म्हणून जास्त विश्वासार्ह मानण्यांत येतील, हाहि महत्त्वाचा प्रश्न आहे. नोकरी देणारांनीं, अपत्यांच्या संख्येच्या मर्यादेस महत्त्व देण्यास प्रारंभ केला, तर कुटुंबनियोजनाच्या प्रचारास उत्कृष्ट चालना मिळेल.

---

**दिल्लींतील ट्रॅम वहातूक बंद होणार**—जुन्या दिल्लींतील कांहीं भागांत ५० वर्षांपूर्वी सुरू करण्यांत आलेली ट्रॅम वाहतूक अद्याप चालू आहे. सुरवातीच्या २८ गाड्यांपैकीं आतां फक्त १० राहिल्या आहेत. त्याहि ह्या वर्षअखेर बंद करण्यांत येतील. ट्रॅम वाहतूक तोट्यांत चालत आहे. दरमहा सुमारें ३०,००० रुपयांचा तोटा येतो.

# अर्थ

बुधवार, ता. २५ जून, १९५८



संस्थापक :
मा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अमेरिकेंत आलेल्या मंदीचे परिणाम

अमेरिकेंतील आर्थिक जीवनावर जी मंदीची छाया पडली आहे तिचे परिणाम निरनिराळ्या देशांवर वेगवेगळे होत आहेत. कांहीं देशांना आपल्या जवळील सोन्याला मुकावें लागत आहे, तर इतर कांहीं देश आपल्या परदेशीय चलनाच्या सांठ्यांत भर घालीत आहेत. भारताच्या परदेशीय चलनांत भर पडत नाहीं. परंतु जपान मात्र आपल्या हुंडणावळींत भर घालीत आहे. कॅनडानें आयातींत कपात केली असून अमेरिकन भांडवलाला आपल्या देशांत येण्याची मुभा ठेवली आहे. त्यामुळें कॅनडांत येऊं घातलेल्या आर्थिक मंदीला आळा बसला आहे. मंदीचा सगळयांत अधिक विपरीत परिणाम अर्जेंटायनाच्या अर्थव्यवस्थेवर झालेला दिसतो. अर्जेंटायनानें आयातींत खूप मोठी कपात केली आहे. कारण, त्याचा परदेशीय चलनाचा सांठा खूपच खालावला होता. अर्जेंटायना भारताकडून तागाच्या वस्तूंची आयात करतो. परंतु आतां ही आयात कमी होणार आहे, आणि भारताला मिळणाऱ्या परदेशीय चलनांत त्यामुळें घट होणार आहे. फ्रान्स देश तर बराच काळपर्यंत निर्यातपिक्षां आयात अधिक करीत आहे. अर्थातच त्याचा परदेशीय चलनाचा सांठा कमी होत चालला होता. आतां जनरल द गॉल अधिकारावर आल्यानें परिस्थितींत सुधारणा होण्याचा संभव आहे, असें म्हणतात. पश्चिम जर्मनींतील भरभराट अद्याप चालू असून परदेशीय चलनाच्या त्याच्या सांठ्यांत वाढ झाल्यामुळें जुनीं आंतरराष्ट्रीय कर्जें देण्याची त्याची पात्रता अधिकच वाढली आहे. खुद्द अमेरिकेंतून सोनें बाहेर जात असल्यानें डॉलरची टंचाई कमी होण्याची शक्यता आहे.

## चित्रपट निर्यातीसाठी सरकारी कौन्सिल

भारतीय चित्रपटांची निर्यात वाढविण्यासाठी मध्यवर्ती सरकार एका कौन्सिलची स्थापना करणार आहे. निर्यात वाढविण्यासाठी जीं इतर कौन्सिलें उभारण्यांत आलीं आहेत तीं सरकारच्या उद्योगखात्याच्या मार्गदर्शनाखालीं काम करतात, पण, चित्रपट-निर्यात-कौन्सिल नभोवाणी व माहिती खात्याच्या अखत्यारींत राहणार आहे. भारतांत तयार झालेल्या चित्रपटांची निर्यात कितपत होते आणि तींत वाढ करण्यास किती वाव आहे, ह्यासंबंधीं नुकतीच पहाणी करण्यांत आली आहे. भारत सरकारचें व्यापार-उद्योग खातें, माहिती व नभोवाणी खातें आणि चित्रपटधंद्याचे प्रतिनिधी ह्यांनीं ही पहाणी केली. हिंदी चित्रपट परदेशांत निर्यात करण्यांत काय अडचणी येतात त्यासंबंधीं पहाणींत विचार करण्यांत आलेला आहे. त्यावरून असें दिसतें कीं परदेशांत पाठविलेल्या चित्रपटांनीं मिळविलेलें परदेशीय चलन भारतांत पाठविणें अवघड जातें. हिंदी चित्रपट मध्यपूर्व भागांत व आग्नेय आशिआंत मुख्यतः पाठविले जातात. ह्या भागांतील देशांना हिंदी चित्रपट पाहिजे असतात; पण त्यांच्या बदला आपले चित्रपट भारतानें घ्यावे असें त्यांचें म्हणणें असतें. रशिआचाहि असाच आग्रह असतो. पण भारताला बदली चित्रपट आणण्याची कल्पना रुचत नाहीं. कारण, ते चित्रपट पहाण्यासाठीं पुरेसा प्रेक्षकवर्ग भारतांत मिळत नाहीं. म्हणून परदेशीय हुंडणावळीबाबतची बंधनें थोडीं ढिलीं करण्यांत आलीं तर भारताला हवीं आहेत. हीं बंधनें शिथिल करण्यांत आल्यास चित्रपटांनीं मिळविलेलें परदेशी चलन कच्ची फिल्म आयात करण्यासाठीं वापरतां येईल.

## लाखेची निर्यात वाढविण्याचे प्रयत्न

लाखेची निर्यात वाढविण्यासाठीं आणि त्याच्या किंमती स्थिर पातळीवर राखण्यासाठीं मध्यवर्ती सरकार प्रयत्न करीत आहे. भारतामधील लाखेच्या उत्पादनाबद्दल चौकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली होती. कमिटीनें आपल्या अहवालांत असा निष्कर्ष काढला आहे कीं, देशांतील लाखेचें उत्पादन वाढण्यासारखें आहे. ह्या वस्तूच्या निर्यातींत वाढ करण्यासाठीं नवीन बाजारपेठा मिळविणें, त्याच्या किंमती वाजवी ठेवणें आणि पुरवठा नियमितपणें करणें, ह्या उपायांची सूचना करण्यांत आली आहे. लाखेच्या निर्यातींत भारताला मुख्यतः सयामच्या स्पर्धेला तोंड द्यावें लागतें. विशेषतः अमेरिकेच्या बाजारपेठेंत ही स्पर्धा अधिक तीव्रतेनें जाणवते. लाखेचा उपयोग ध्वनिमुद्रिका करण्यासाठीं करण्यांत येतो. तथापि, त्याशिवाय इतर रीतीनें लाखेचा उपयोग करण्याची शक्यता अलीकडे वाढली आहे. जर्मनी व रशिया ह्या देशांत नव्या बाजारपेठा काबीज करणेंहि शक्य आहे. १९३५ सालापासून लाखेबाबत संशोधन करण्यांत येत आहे त्यामुळें लाखेचें उत्पादन व पुरवठा ह्यांच्यात वाढ झाली आहे. रंगाच्या व इतर उद्योगधंद्यांत लाखेचा उपयोग करण्यांत येऊं लागल्यानें देशांतील मागणीहि वाढत चाललेली आहे. लाख ही मुख्यतः बंगाल व मध्यप्रदेश ह्या राज्यांतील जंगलांत मिळते. पूर्वी लाखेचा उपयोग बांगड्यासाठीं करण्यांत येत असे. पण, अलीकडे तसा उपयोग कमी प्रमाणावर होऊं लागला आहे. लाख व अभ्रक ह्या दोन वस्तूंच्या बाबतींत भारताची मक्तेदारी होती. अलीकडे मात्र त्यांच्या बदली दुसऱ्या कृत्रिम वस्तू वापरण्यांत येऊं लागल्या आहेत.

## खेळांच्या साहित्याचा भारतांतील मोठा कारखाना

इंग्लंडमधील क्रीडा साहित्याचे सुप्रसिद्ध कारखानदार स्लॅझेंजर्स ह्यांच्या सहकार्यानें ए. एच. व्हीलर आणि कं. (प्रायव्हेट) लि. अलाहाबाद येथें चांगल्या दर्जाचें क्रीडासाहित्य तयार करण्याचा कारखाना उभारणार आहे. 'स्लॅझेंजर्स' ह्या नांवाखालीच व्हीलर कंपनी लायसेन्स पद्धतीनें उत्पादन करील. जगांतील वेगवेगळ्या देशांतून स्लॅझेंजर्सचे स्वतःचे कारखाने आहेत; पण पूर्व जर्मांतील कोणालाहि व्हीलर कंपनीप्रमाणें अधिकार देण्यांत आलेला नाहीं. व्हीलर कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. अनुकूल बानर्जी, हे कारखान्याच्या उभारणीची तयारी पुरी करण्यासाठीं, यंत्रसामुग्री मागविण्यासाठीं व निर्गतीच्या बाजारपेठांची पहाणी करण्यासाठीं इंग्लंडला गेले आहेत.

# THE PRESIDENCY INDUSTRIAL

## Balance Sheet as

| Rs. | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Capital** | | |
| 10,00,000 | *Authorised Capital* 10,000 Shares of Rs. 100 each ... | | 10,00,000—00 |
| 10,00,000 | *Issued Capital* 10,000 Shares of Rs. 100 each ... | | 10,00,000—00 |
| 7,50,000 | *Subscribed and Paid-up Capital* 10,000 Shares of Rs. 100 each Rs. 75 per Share called up ... | 7,50,000—00 | |
| 19,425 | Less: 259 Shares forfeited ... | 19,425—00 | |
| 7,30,575 | 9741 | 7,30,575—00 | |
| 9,750 | Less: Calls unpaid ... | 9,750—00 | |
| 7,20,825 | | 7,20,825—00 | |
| 9,665 | Add: Forfeited Shares ... | 9,665—00 | |
| 7,30,490 | | 7,30,490—00 | 7,30,490—00 |
| 20,750 | **1.A Calls Received in Advance:** ... | | 20,725—00 |
| 2,79,161 | **2. Reserve Fund & Other Reserves** ... | | 2,79,160—45 |
| | **3. Deposits and Other Accounts** | | |
| 13,72,358 | (1) Fixed Deposits ... | 10,79,350—50 | |
| 12,02,998 | (2) Savings Bank Deposits ... | 10,94,252—43 | |
| 9,78,177 | (3) Current Deposits and Contingency a/cs. etc. ... | 10,79,501—97 | 32,53,104—90 |
| 35,53,533 | | | |
| | **4. Borrowings from Other Banking Companies, Agents, etc.** | | |
| 12,30,019 | (1) In India. ... | 13,21,993—67 | |
| ... | (2) Outside India. ... | 0—00 | 13,21,993—67 |
| | *Particulars* | | |
| 12,30,019 | (1) Secured by part of Banking Company's Investments ... | 13,21,993—67 | |
| ... | (2) Unsecured. ... | ... | |
| 12,30,019 | | 13,21,993—67 | |
| 10,961 | **5. Bills Payable** ... | | 12,123—62 |
| | **6. Bills for Collection, (being Bills Receivable as per contra)** | | |
| 58,460 | (1) Payable in India ... | 47,613—68 | |
| ... | (2) Payable outside India ... | ... | 47,613—68 |
| | **7. Other Liabilities** | | |
| 12,336 | Interest Suspense ... | 57,225—92 | |
| 11,094 | Unclaimed Dividends ... | 10,732—88 | |
| ... | Branch Adjustments ... | 877—00 | |
| 54,767 | Other Sundry Liabilities ... | 30,183—35 | 99,019—15 |
| 78,197 | | | |
| 59,61,571 | Carried over ... | | 57,64,230—47 |

# BANK LIMITED, POONA CITY.

## at 31st December, 1957

| Rs. | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| | **1. Cash** | | |
| 5,26,002 | In hand, with Reserve Bank and State Bank of India.. | | 4,95,774—40 |
| | **2. Balances with other Banks** ( In Current Account ) | | |
| 46,261 | ( 1 ) In India ... | 15,101—97 | |
| ... | ( 2 ) Outside India ... | ... | 15,101—97 |
| ... | **3. Money at Call and Short Notice** ... | | 0—00 |
| 22,19,419 | **4. Investments at cost.** | | 22,20,419—12 |
| | ( 1 ) Securities of the Central and State Governments and other Trustee securities, including Treasury Bills of the Central and State Governments. ( out of those, securities of the face value of Rs. 20,25,000 are with Banks against overdraft arrangements ) | | |
| 22,06,869 | ( Average market value Rs. 19,83,995 ) ... | 22,07,869—12 | |
| | ( 2 ) Ordinary Shares fully paid up. | | |
| 12,550 | ( Realisable value Rs. 12,550 ) ... | 12,550—00 | |
| ... | ( 3 ) Debentures or Bonds ... | 0—00 | |
| ... | ( 4 ) Other Investments ... | 0—00 | |
| ... | ( 5 ) Gold ... | 0—00 | |
| | ( Investments, which have no market quotations have been shown at their realisable value ) | | |
| 22,19,419 | | 22,20,419—12 | |
| 28,33,957 | **5. Advances :** | | 27,05,264—10 |
| | ( Other than Bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the auditors ) ... | | |
| | ( 1 ) *Loans, Cash Credits, Overdrafts, etc.* | | |
| 28,23,773 | In India ... | 27,04,028—10 | |
| ... | Outside India ... | 0—00 | |
| 28,23,773 | | 27,04,028—10 | |
| | (2) *Bills, Discounted and Purchased* ( excluding Treasury Bills of the Central and State Governments. ) | | |
| 10,184 | ( 1 ) In India ... | 1,236—00 | |
| ... | ( 2 ) Payable outside India ... | 0—00 | |
| 28,33,957 | | 27,05,264—10 | |
| | **Particulars of Advances :—** | | |
| 15,88,838 | (1) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured ... | 14,26,955—28 | |
| 10,40,456 | (2) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 10,00,974—40 | |
| 8,884 | (3) Debts considered good, and secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal securities of the debtors ... | 9,460—90 | |
| 1,95,778 | (4) Debts considered doubtful or bad, not provided for. | 2,67,873—52 | |
| 28,33,957 | | 27,05,264—10 | |
| 3,399 | (5) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | Nil | |
| ... | (6) Debts due by Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, partners or Managing Agents, or in the case of private companies as Members ... | Nil | |
| 8,583 | (7) Maximum total amount of advances including temporary advances, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons ... | Nil | |
| 83,045 | (8) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the Companies or Firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners, or Managing Agents, or in the case of private Companies, as Members. ... | Nil | |
| ... | (9) Due from Banking Companies ... | Nil | |
| 56,25,639 | Carried Over ... | | 54,36,559—59 |

# THE PRESIDENCY INDUSTRIAL

## Balance Sheet as

| Rs. | CAPITAL & LIABILITIES | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 59,61,571 | Brought Forward ... | | 57,64,230—47 |
| ... | 8. **Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra :** | | 0—00 |
| | *Contingent Liability :* | | |
| | There is a claim for Rs. 7634—08 against the Bank which is not acknowledged as a debt. | | |
| 59,61,571 | Total Rs. ... | | 57,64,230—47 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ended 31st December, 1957

| Rs. | EXPENDITURE | | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 1,34,339 | 1. Interest paid on Deposits and Borrowings etc. ... | | 1,44,807—48 |
| | 2. Salaries and Allowances and Provident Fund:— ... | | 72,293—28 |
| 6,000 | Director | 2,500—00 | |
| 2,125 | Managing Director | 0—00 | |
| 7,625 | Manager | 7,343—75 | |
| 69,801 | Others | 62,449—53 | |
| | 3. Directors' and Local Committee Members' Fees : | | 909—50 |
| 0 | Fees | 0—00 | |
| 1,703 | Allowances (Travelling Expenses) | 909—50 | |
| 4,967 | 4. Rent, Taxes, Insurance, Lighting etc. ... | | 4,970—95 |
| 4,741 | 5. Law Charges. ... | | 535—16 |
| 1,650 | 6. Postage, Telegrams and Stamps. ... | | 1,350—36 |
| 1,200 | 7. Auditors' fees ... | | 1,200—00 |
| 6,582 | 8. Depreciation on and Repairs to the Banking Company's Property. ... | | 5,768—50 |
| 6,071 | 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | | 7,407—01 |
| 1,634 | 10. Loss from sale of or dealing with Non-Banking Assets ... | | 1,771—82 |
| 9,096 | 11. Other Expenditure. ... | | 9,266—45 |
| ... | 12. Balance of Profit ... | | 0—00 |
| 2,57,534 | Total Rs. ... | | 2,50,280—51 |

| Rs. | INCOME | Rs. nP. |
|---|---|---|
| | (Less Provision made during the year for Bad and Doubtful Debts and other usual or necessary provisions.) | |
| 2,23,214 | 1. Interest and Discount. ... | 1,91,690—76 |
| 9,044 | 2. Commission, Exchange and Brokerage. ... | 5,777—20 |
| 360 | 3. Rent. ... | 360—00 |
| ... | 4. Net Profit on sale of Investments, Gold, Silver, Land, premises and other Assets (not credited to Reserve or any particular Fund or Account.) ... | |
| ... | 5. Net Profit on Revaluation of Investments, Gold Silver, Land, Premises and other Assets (not credited to Reserves or any particular Fund or Account.) ... | ... |
| 3,708 | 6. Income from Non-Banking assets and Profit from sale of or dealing with such assets ... | ... |
| 64 | 7. Other Receipts ... | 3,663—75 |
| 21,144 | 8. Loss ... | 271—96 |
| | ... | 48,516—84 |
| 2,57,534 | Total Rs. ... | 2,50,280—51 |

## AUDITOR'S REPORT TO THE SHARE-HOLDERS

We have audited the annexed Balance Sheet of the Presidency Industrial Bank Limited, Poona as at 31st December 1957, and also the Profit and Loss Account of the Bank for the year ended on that date in which are incorporated the returns of Bombay Branch audited by us.

In accordance with the provisions of Section 29 of the Banking Companies Act, 1949, read with the provisions to Sub-section (1) and (2) of section 211 and sub-section (5) of section 211 and section 227 (5) of the Companies Act, 1956, the Balance Sheet and Profit and Loss Account are not required to be and are not drawn-up in accordance with the Sixth Schedule of the Companies Act, 1956. The Accounts are therefore drawn up in conformity with Forms A and B of the Third Schedule to the Banking Companies Act, 1949.

# BANK LIMITED POONA, CITY.

## at 31st December 1957

| Rs. | PROPERTY & ASSETS | Rs. nP. | Rs. nP. |
|---|---|---|---|
| 56,25,639 | Brought Forward ... | | 54,36,559—59 |
| | 6. Bills Receivable. Being Bills for Collection as per contra | | |
| 58,460 | (1) Payable in India ... | 47,613—68 | |
| ... | (2) Payable outside India ... | ... | 47,613—68 |
| | 7. Constituents' Liabilities for Acceptances, Endorsements and Other Obligations as per contra ... | | 0—00 |
| | 8. Premises : | | |
| | Cost as per last Balance Sheet ... | 25,013—87 | |
| 17,348 | Less : Total Depreciation written off ... | 8,033—87 | 16,980—00 |
| | 9. Furniture and Fixtures : | | |
| | Cost as per last Balance Sheet ... | 40,964—11 | |
| | Additions during the year. ... | 4—00 | |
| | | 40,968—11 | |
| | Less : Sales during the year ... | 0—00 | |
| | | 40,968—11 | |
| 21,796 | Less : Total Depreciation written off ... | 20,628—36 | 20,339—75 |
| 1,41,593 | 10. Other Assets Including Silver | | 1,01,303—83 |
| 20,570 | (1) Interest accrued on Investment ... | 20,601—42 | |
| 17,260 | (2) Printing and Stationery on hand ... | 15,631—00 | |
| 1,806 | (3) Deposit with Telephone and Electric Company | 1,662—00 | |
| 59,858 | (4) Income-Tax paid in advance at source ... | 40,109—67 | |
| 16,701 | (5) Legal Expenses pending adjustment ... | 14,239—78 | |
| 317 | (6) Stamps on hand ... | 242—75 | |
| 8,123 | (7) Balance in C/a with Co-op Banks ... | 7,476—96 | |
| 200 | (8) Advances ... | 0—00 | |
| 1,302 | (9) Outstanding Debtors ... | 895—25 | |
| 10,368 | (10) Refund of Income-Tax due ... | 0—00 | |
| 2,298 | (11) Branch Adjustments ... | 0—00 | |
| 2,790 | (12) Guarantee Under Letter of Credit ... | 445—00 | |
| 1,41,593 | | 1,01,303—83 | |
| 76,360 | 11. Non-Banking Assets Acquired in Satisfaction of Claims ... | | 72,542—00 |
| | 12. Profit and Loss Account : | | |
| | Balance as per last Balance Sheet ... | 20,374—78 | |
| 20,375 | Add : Loss for the year as per annexed Statement ... | 48,516—64 | 68,891—62 |
| 59,61,571 | Total Rs. ... | | 57,64,230—47 |

G. R. Sathe *Chairman.*

B. Y. Pathak, *Accountant.* G. D. Joglekar, *Manager*

C. T. Chitale
W. P. Vadiya
G. U. Chitale
V. N. Sardesai
} *Directors.*

Shri. B. N. Sanas being out of station did not sign.

We report that (a) We have obtained all the information and explanations which, to the best of our knowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.

(b) The transactions of the bank which have come to our notice, have been within the powers of the Bank.

(c) In our opinion, proper books of account as required by law have been kept by the bank so far as appears from our examination of those books and proper returns adequate for the purpose of our audit have been received from the Bombay Branch of the Bank.

(d) The Bank's Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are in agreement with the books of account and the returns.

(e) In our opinion, and to the best of our information and according to the explanations given to us, the said accounts give the information required by the Companies Act, 1956, in the manner so required for Banking Companies, and on such basis the said Balance Sheet gives a true and fair view of the state of the affairs of the Bank as at 31st December, 1957, and the Profit and Loss Account gives true and fair view of the loss for the year ended upon that date.

B. C. Abhyankar & Co.
*Chartered Accountants.*

Poona City, Dated 24th May, 1958.

## अमेरिकेशीं व्यापार करण्याची तयारी

रशिआचे पंतप्रधान मि. क्रुश्चॉव्ह ह्यांनीं अमेरिकेशीं मोठ्या प्रमाणावर व्यापार करण्याची रशिआची तयारी असल्याचें प्रकट केलें आहे. बड्या राष्ट्रांपैकी अमेरिका हा एकटाच असा देश आहे कीं त्यानें रशिआशीं व्यापारी करार केलेला नाहीं. त्याच-प्रमाणें अटलांटिक संरक्षण करार संघटनेंतील देशांनींहि रशिआशीं व्यापार करतांना कांहीं विवक्षित प्रकारचा लष्करी महत्त्वाचा माल पाठवूं नये अशी अमेरिकेची अपेक्षा आहे. पण, ही अपेक्षा व्यवहारांत पूर्ण करणें अतिशय कठीण जातें. कारण, लष्करी दृष्टीनें महत्त्वाच्या व बिगर-महत्त्वाच्या वस्तू ठरविणें अशक्यप्राय झालेलें आहे. त्यामुळें आणि पश्चिम जर्मनीसारख्या प्रमुख देशांत औद्योगिक मंदीचीं पावलें वाजूं लागल्यामुळें रशिआशीं होणारा व्यापार अधिक खुला व्हावा अशी मागणी पश्चिम युरोपांतील देशांत वाढत्या जोरानें करण्यांत येत आहे. खुद्द अमेरिकेंतील मंदीचें वातावरण अद्याप पूर्णपणें निवळलेलें नाहीं आणि तें केव्हां निवळेल तें सांगतां येण्यासारखेंहि नाहीं. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन रशिआनें व्यापार-वृद्धीची सूचना अमेरिकेला केली असावी. रशिआला अमेरिकेच्या उत्पादनक्षमतेला मागें टाक-ण्याची घाई झालेली आहे. अर्थातच, अमेरिकेकडून भांडवली स्वरूपाचा माल रशिआला मिळाला तर त्याचा उपयोग करून हें ध्येय साधण्याची शक्यता लवकर दृष्टिपथांत येण्यासारखी आहे. पूर्वीं १९२९-३० सालच्या आर्थिक मंदींत रशिआनें अमेरिके-कडून बराच भांडवली माल घेतलेलाहि आहे.

## ग्रंथमहोत्सवाची नवीन कल्पना यशस्वी

भारतांत आणि परदेशांत ग्रंथांचीं प्रदर्शनें मधून मधून भर-विण्यांत येतात. अशा प्रदर्शनांतून त्या त्या देशांतील पुस्तक-प्रकाशनाच्या प्रगतीचें दर्शन होतें. पण लोकांत उत्तमोत्तम ग्रंथांचा प्रसार होण्याच्या दृष्टीनें तीं फारशी उपयुक्त ठरत नाहींत. दक्षिण अमेरिकेंतील पेरू ह्या देशानें १९५६ सालीं प्रथमच केलेल्या ग्रंथ-महोत्सवानें मात्र बहुमोल ग्रंथांच्या प्रसाराचें ध्येय पुढें ठेवलेलें होतें. पेरू देशांतील विद्वानांनीं केलेल्या ह्या महोत्सवांत देशांतील बहुमोल ग्रंथांच्या स्वस्त किंमतीच्या आवृत्त्या विक्रीस ठेवण्यांत आल्या होत्या. हा पहिलाच महोत्सव इतका यशस्वी झाला कीं, आतां पेरू देशांत तो दरसाल भरविण्यांत येतो. अशा प्रकारचा तिसरा महोत्सव नुकताच करण्यांत आला होता. महोत्सवाच्या पहिल्याच दिवशीं १,००,००० पुस्तकांची विक्री करण्यांत आली. महोत्सवांत दक्षिण अमेरिकेंतील ग्रंथकारांचीं स्वस्त किंमतीचीं पुस्तकें ठेण्यांत आलीं होतीं. महोत्सवाच्या ह्या कल्पनेला लोकांचा खूपच पाठिंबा मिळाला. कित्येक दिवस लोकांच्या चर्चेचा तो एक प्रमुख विषय बनला होता. ग्रंथांचा व ग्रंथकारांचा सन्मान करण्याच्या ह्या कल्पनेला दक्षिण अमेरिकेंतील विद्या-पीठांनींहि चांगला हातभार लावला होता. ह्या निमित्तानें अनेक प्रसिद्ध ग्रंथकारांनीं व्याख्यानें दिलीं. ग्रंथमहोत्सवाच्या ह्या कल्पनेच्या बाबतींत एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती म्हणजे, ह्या बाबतींत सरकारचा थोडासुद्धां हात नाहीं. शिवाय, कोणत्याहि प्रकारच्या प्रचारापासून महोत्सव अलिप्त आहे. ग्रंथांना समाजांत योग्य स्थान मिळविण्याचा हा प्रयत्न आहे.

## एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेचें १५ कोटी डॉलरचें कर्ज

भारताच्या विकास योजनांसाठी लागणाऱ्या भांडवली यंत्र-सामुग्रीच्या खरेदीसाठी अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेकडून मिळावयाच्या १५ कोटी डॉलरच्या कर्जाबाबत १२ जून रोजीं वॉशिंग्टन येथें दुपारीं १२ वाजतां एका करारावर स्वाक्षऱ्या करण्यांत आल्या. ह्या कर्जाचा दर ५॥ टक्के राहणार असून तें १५ वर्षांत फेडावयाचें आहे. मुद्दलाची फेड १५ जानेवारी १९६४ पासून सुरू होईल. या करारानुसार, या आधीं दि. ४ मार्च, १९५८ रोजीं जाहीर केल्याप्रमाणें सरकारी तसेंच खाजगी क्षेत्रांतील खालील प्रकारच्या औद्योगिक कामांसाठी भांडवली स्वरूपाची यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी या कर्जाचा उपयोग करतां येतील. पाटबंधारे व पडीत जमिनीची लागवड, वीज, वाहतूक, दळणवळण, खाणकाम व कापड, रासायनिक धंदे, हेवी स्ट्रक्चरल व इलेक्ट्रिकल यंत्रसामुग्री व मशीन टूल्स यांसारखे कांहीं निवडक धंदे. तथापि, भारत सरकार व अमेरिकेची एक्सपोर्ट-इम्पोर्ट बँक यांच्या परस्परांच्या संमतीनें या यादींत कांहीं फेर-बदलहि करतां येईल.

एक्सपोर्ट-इम्पोर्ट बँकेनें दिलेल्या इतर कर्जाप्रमाणेंच याहि बाबतींत सर्व माल अमेरिकेंतच खरेदी करावा लागेल व त्याची रवानगीहि अमेरिकन बोटींतून करावी लागेल.

या कर्जाच्या विनियोगाबद्दलची सर्व तपशीलवार व्यवस्था या आधींच भारत सरकारबरोबर नक्की करण्यांत आली आहे. खासगी क्षेत्राचा विचार करतां १८ मार्च व १८ एप्रिल, १९५८ रोजीं जाहीर नोटिसा काढण्यांत आलेल्या आहेत. या कर्जा-नुसार खरेदी करावयाच्या यंत्रसामुग्रीसाठी नोंदवावयाच्या सर्व मागण्या पुढील बारा महिन्यांच्या आंत नोंदवाव्या लागतील.

## कुंभारकाम शिक्षण योजना

कुंभारकामावर भारतांत आज अंदाजें १० लाख कुटुंबांचें जीवन अवलंबून आहे. या धंद्याचें स्वरूप अगदीं मागासलेल्या पद्धतीचें आहे. यांत सुधारणा करण्याकरितां, अखिल भारतीय खादी ग्रामोद्योग मंडळानें एक योजना नुकतीच जाहीर केली आहे.

या योजनेप्रमाणें कुंभारकामाच्या शिक्षणाचें व संशोधनाचें मध्यवर्ती जोडकेंद्र खानापूर (जि. बेळगांव) येथें सुरू करण्यांत आलें आहे.

या शिक्षण केंद्रांत दोन शिक्षणक्रम आहेत. (१) 'कुंभार-काम प्रवीण' शिक्षणक्रम (Pottery Expert Course) आणि (२) 'निपुण कुंभार' शिक्षणक्रम (Master Potters Course).

## मुंबई शहरांतील दाटी

मुंबई शहराची लोकसंख्या ३३ लक्ष असून, शहरांतील घरां-तून १५ लक्ष लोक राहूं शकतील, एवढीच खरी सोय आहे. गेल्या २५ वर्षांत वस्ती १५०% वाढली, पण घरांत वाढ फक्त ३५% झाली. शहरांतील सर्व रहिवाशांची रहाण्याची सोय करा-वयाची म्हटलें, तर त्याच्या बांधकामास सुमारें १५८ कोटी रुपये खर्च येईल.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.